Date : 03-Apr-2011 Edition : Mumbai Page No.: 16 Page Name: n.a. Size: 102.7 sq. cm

Sector: Others Circulation: 232375 AVE: INR 56998.43 Frequency: Daily

Publication: Loksatta Title: Jai Kissan on Wankhede...

News Monitored for: Pepsi - Brands

लोकसत्ता

# वानखेडेवर जय किसान...

■ मुंबईत वानखेडे स्टेडिमयमध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम लढतीचे तिकीट मिळवण्यात अनेक चाहत्यांच्या पदरी निराशा पडली असली तरी काही निवडक शेतकरी मात्र नशिबवान ठरले. भारत आणि श्रीलंका यांच्यादरम्यान शनिवारी खेळल्या गेलेल्या अंतिम लढतीदरम्यान वानखेडे स्टेडियममध्ये उपस्थित निवडक शेतकरी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आयसीसीचे अध्यक्ष असून त्यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांना स्टेडियममध्ये स्थान मिळाल्याची चर्चा होती. आयसीसीचे स्पॉन्सरर असलेल्या पेप्सी कंपनीतर्फे निवडक शेतकऱ्यांना सामना बघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतात सात केंद्रावर खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामने बघण्याची संधी भारतातील ८४ शेतकऱ्यांना मिळाली. अंतिम सामना बघण्यासाठी महाराष्ट्रीतील तीन शेतकऱ्यांची निवड करण्यात आली होती, असे कंपनीतर्फे कळवण्यात आले.

वानखेडे स्टेडियममध्ये अंतिम सामना बघण्याची संधी मिळेल असे कधी वाटले नव्हते, अशी प्रतिक्रिया कुमाठे (सातरा) येथील ४७ वर्षीय महादेव मांडवे या शेतकऱ्याने व्यक्त केली. मंचर (पुणे) येथील ३५ वर्षीय राम टोडकर म्हणाले की, अंतिम सामना बघण्याची संधी मिळाल्यामुळे झालेला आनंद शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. अंतिम सामना बघताना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून समाधान झाले असल्याचे पेप्सी कंपनीची भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी वरुण बेरी यांनी सांगितले. पेप्सी कंपनीतर्फे बटाट चिप्सचे उत्पादन करण्यात येते. त्यानिमित्ताने कंपनीसोबत २२ हजार शेतकरी जुळलेले असल्याचे बेरी यांनी सांगितले.



© Loksatta